# नवी मुंबई महानगरपालिका

## धोकादायक इमारतीविषयी जाहीर आवाहन

**मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ पोटकलम (१), (२), (३), (४) अन्वये नोटिस**

उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने या नोटिसीद्वारे नवी मुंबई, वाशी सेक्टर क्र.१० येथील सिडको विकसित जेएन-१ प्रकारच्या भुखंड क्र.४ व ४-१ वरील शांतीकुंज अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, वाशी येथील १ ते १२ हया इमातरतींमध्ये वास्तव्य करणारे मालक / भोगवटादार किंवा इतर यांना असे कळविण्यात येते की, आपण रहात असलेली इमारत निवासी / वाणिज्य वापराकरीता धोकादायक असल्याबाबत भारतीय प्राद्योगिक संस्था, मुंबई यांनी आपल्या अहवालात म्हटले असून सदर इमारती डागडुजी/दुरुस्ती करण्यापलिकडील असल्याने या इमारतींमधील निवासी / वाणिज्य वापर तात्काळ थांबवावा. सदर इमारतीमधील सर्व रहिवाशांनी स्वत:हून आपल्या निवासी सदनिका त्वरीत रिकाम्या कराव्यात किंवा सदर इमारती तोडून टाकणेबाबत योग्य ती कार्यवाही सुरु करावी. असे याद्वारे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

आपण रहात असलेल्या इमारतींचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारती कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याचा संभव आहे. सदर इमारतींचा निवासी / वाणिज्य वापर त्वरीत बंद करुन सदरच्या इमारती त्वरीत विनाविलंब तोडून टाकाव्यात.

अशी कार्यवाही न केल्यास इमारती कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त आपणच जबाबदार रहाल महापालिका यास जबाबदास रहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**